सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

( सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-३३)

# महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८२

(दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित)

MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1982

# The Maharashtra Textile Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act, 1982

*(As modified upto 26th January 2016)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१६

(किंमत रु. २२.००)

(सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३)

# महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८२

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| उद्देशिका. | | पृष्ठे |
| कलमे. | | |
| १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ. .. .. .. .. .. | १ |
| २ | व्याख्या. .. .. .. .. .. | २ |
| ३ | वस्त्रनिर्माण कंपन्यांचे त्यांच्या उपक्रमांसंबंधीचे हक्क संपादित व हस्तांतरित करणे. .. | २ |
| ४ | निहितीकरणाचा सर्वसाधारण परिणाम. .. .. .. .. .. | २ |
| ५ | उपक्रम व त्याच्या संबंधित दस्तऐवज यांचा ताबा देण्याचे कर्तव्य. .. .. | ३ |
| ६ | तपशिल पुरवण्याचे कर्तव्य. .. .. .. .. .. | ३ |
| ७ | राज्य शासनाने राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या मत्तांच्या मूल्याइतके शेअर्स महामंडळाने विक्रीला काढणे. .. | ३ |
| ८ | संपादनाबद्दल रक्कम देणे. .. .. .. .. .. | ४ |
| ९ | उपक्रमांचे व्यवस्थापन व प्रशासन. .. .. .. .. .. | ४ |
| १० | कंपन्यांच्या विवक्षित कर्मचाऱ्यांची नोकरी महामंडळाकडे चालू राहणे. .. | ४ |
| ११ | शास्ती. .. .. .. .. .. | ४ |
| १२ | कंपन्यांनी केलेले अपराध. .. .. .. .. .. | ५ |
| १३ | सद्‌भावपूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण. .. .. .. .. | ५ |
| १४ | अडचणी दूर करण्याचा अधिकार. .. .. .. .. .. | ६ |
| १५ | निरसन व व्यावृत्ती. .. .. .. .. .. | ६ |

## (सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३[१])

# [महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८२]

[राष्ट्रपती यांची दिनांक १३ ऑक्टोबर १९८२ रोजी अनुमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक १४ ऑक्टोबर १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**देशाच्या गरजांसाठी अत्यावश्यक अशा मालाचे उत्पादन चालू ठेवणे व ते वाढवणे या गोष्टी सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी दोन वस्त्रनिर्माण कंपन्यांच्या उपक्रमांचे संपादन करण्यासाठी तसेच त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** औद्योगिक उपक्रमांचे मालक असणारे मेसर्स विजय मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (प्रायव्हेट) लिमिटेड, बडनेरा आणि मेसर्स वेस्टर्न इंडिया स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, मुंबई हे, उद्योग (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ याच्या पहिल्या अनुसूचीत उल्लेख केलेल्या वस्तूंचे म्हणजे कापडाचे उत्पादन करीत होते;

१९५१ चा ६५.

**आणि ज्याअर्थी,** मुंबई उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली या कंपन्यांचे समापन करण्यात येत आहे व या कंपन्यांच्या व्यवसाय चालू ठेवण्यात येणार नाही;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमाच्या कलम १८-चक खाली भारत सरकारच्या वतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांनी या दोन कंपन्यांच्या औद्योगिक उपक्रमांचे व्यवस्थापन ताब्यात घेतले आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या व देशाच्या गरजांसाठी आवश्यक मालाचे उत्पादन सातत्याने चालू रहावे याची निश्चिती करण्यासाठी उक्त उपक्रमांचे संपादन करणे व त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे.

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते.

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता तात्काळ कृती करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल, यांची खात्री झाली होती व म्हणून महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८२ हा दिनांक २४ ऑगस्ट १९८२ रोजी प्रख्यापित केला होता;

१९८२ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८२ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २४ ऑगस्ट १९८२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, दिनांक १४ ऑक्टोबर १९८२, भाग पाच, (इंग्रजी) पृष्ठे ३४० व ३४१ पहा.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(अ) ''नेमलेला दिवस'' म्हणजे, या अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख;

(ब) ''कंपनी'' किंवा ''वस्त्रनिर्माण कंपनी'' म्हणजे, ज्या, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या अर्थानुसार असणाऱ्या कंपन्या असून ज्यांची नोंदणीकृत कार्यालये महाराष्ट्र राज्यामध्ये आहेत अशा, मेसर्स विजय मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (प्रायव्हेट) लिमिटेड, बडनेरा, किंवा यथास्थिति मेसर्स वेस्टर्न इंडिया स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, मुंबई; १९५६ चा १.

(क) ''महामंडळ'' किंवा ''राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ'' म्हणजे, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये कायद्याने संस्थापित व नोंदलेली कंपनी असणारे महाराष्ट्र राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ मर्यादित, मुंबई; १९५६ चा १.

(ड) ''न्यायालय'' म्हणजे, मुंबई उच्च न्यायालय;

(ई) ''उपक्रम'' म्हणजे, संबंधित वस्त्रनिर्माण कंपनीच्या मालकीचा औद्योगिक उपक्रम;

(फ) यामध्ये वापरलेल्या आणि व्याख्या न केलेल्या परंतु कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, अनुक्रमे त्या अधिनियमामध्ये नेमून दिलेले अर्थ असतील. १९५६ चा १.

वस्त्रनिर्माण कंपन्यांचे, त्यांच्या उपक्रमांबंधीचे हक्क संपादित व हस्तांतरित करणे.

**३.** (१) नेमलेल्या दिवशी, दोन्ही वस्त्रनिर्माण कंपन्यांचे उपक्रम आणि संबंधित कंपनीचा आपल्या उपक्रमासंबंधीचा हक्क, स्वामित्व हक्क व हितसंबंध या अधिनियमाच्या अर्थानुसार, राज्य शासनाकडे हस्तांतरित होतील व ते पूर्णपणे राज्य शासनाकडे निहित होतील.

(२) पोट-कलम (१) च्या अर्थानुसार राज्य शासनाकडे निहित असणारा प्रत्येक उपक्रम अशा रीतीने तो निहित झाल्यानंतर, ताबडतोब राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होईल.

निहिती-करणाचा सर्वसाधारण परिणाम.

**४.** (१) या दोन वस्त्रनिर्माण कंपन्यांपैकी प्रत्येकीच्या उपक्रमांमध्ये नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, त्या उपक्रमाच्या संबंधात संबंधित कंपनीच्या मालकीची, ताब्यातील, अधिकारातील किंवा नियंत्रणाखाली असणारी भारतातील किंवा भारताबाहेरील सर्व मत्ता, हक्क, पट्टेदारी, अधिकार, प्राधिकार व विशेषाधिकार आणि रोख शिल्लक, हातातील रोकड, राखीव निधी व गुंतवणुका धरून, सर्व जंगम आणि स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेवरील किंवा त्यातून निर्माण होणारे इतर सर्व हक्क आणि हितसंबंध आणि त्यांच्याशी संबंधित कोणत्याही स्वरूपाची लेखापुस्तके, नोंदवह्या व इतर सर्व दस्तऐवज यांचा समावेश होतो, असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— शंका निवारणासाठी याद्वारे, असे जाहीर करण्यात येत आहे की, ''कंपनीचा उपक्रम'' यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही :—

(अ) कंपनीला देय असणारी कोणतीही ऋणे; आणि

(ब) कंपनीने आपल्या भागधारकांकडून किंवा संचालकांकडून वसूल करण्याजोग्या असलेल्या कोणत्याही रकमा.

(२) कलम ३ अन्वये राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे निहित केलेली, उपक्रमामध्ये पूर्वोक्तप्रमाणे समाविष्ट अशी सर्व मालमत्ता ही, अशा निहितीकरणामुळे तिच्यावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही विश्वस्त व्यवस्था, बोजे, गहाणवटीचे व्यवहार, प्रभार, धारणाधिकार व इतर भार यापासून मुक्त व भारमुक्त होईल आणि अशा मालमत्तेचा वापर कोणत्याही प्रकारे निर्बंधित करणारी कोणत्याही न्यायालयाची कोणतीही जप्ती, मनाईहुकूम किंवा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) जर, नेमलेल्या दिवशी, दोन्हींपैकी कोणत्याही कंपनीच्या उपक्रमांच्या कोणत्याही व्यवसायाबाबत त्या कंपनीतर्फे किंवा त्या कंपनीच्याविरूद्ध कोणताही दावा, अपील किंवा कोणत्याही स्वरूपाची इतर कार्यवाही अनिर्णीत असेल तर, कंपनीचा उपक्रम हस्तांतरित झाल्याच्या किंवा या अधिनियमात समाविष्ट अशा कोणत्याही गोष्टींच्या कारणावरून, ती समाप्त होणार नाही, खंडीत होणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे तीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, तर तो दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही संबंधित कंपनीला किंवा तिच्याविरुद्ध चालू ठेवता येईल, करता व अंमलात आणता येईल.

उपक्रम व त्याच्याशी संबंधित दस्तऐवज यांचा ताबा देण्याचे कर्तव्य.

५. (१) कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कंपनीचा शासकीय परिसमापक किंवा जिच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली कोणत्याही कंपनीचा उपक्रम किंवा त्याचा भाग असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीने, कंपनीच्या उपक्रमांचा किंवा तिच्या ताब्यातील अभिरक्षेतील किंवा नियंत्रणाखालील त्याच्या भागाचा ताबा, राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाच्या ताबडतोब स्वाधीन केला पाहिजे.

(२) नेमलेल्या दिवशी शासकीय परिसमापक किंवा जिच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली, महामंडळाकडे निहित झालेल्या कोणत्याही कंपनीच्या उपक्रमांशी संबंधित अशी कोणतीही पुस्तके, दस्तऐवज किंवा अन्य दस्तऐवज असतील अशी इतर कोणतीही व्यक्ती, महामंडळाला किंवा महामंडळ या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीला, उक्त पुस्तकांचा, दस्तऐवजांचा किंवा इतर कागदपत्राचा हिशेब देण्यास जबाबदार असेल.

(३) महामंडळाने, त्याच्याकडे निहित केलेल्या उपक्रमांचा ताबा मिळवण्याकरिता जरूर ते सर्व उपाय योजले पाहिजेत किंवा योजण्याची व्यवस्था केली पाहिजे.

तपशील पुरवण्याचे कर्तव्य.

६. (१) प्रत्येक कंपनीने, राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ या बाबतीत परवानगी देईल एवढ्या मुदतीत, महामंडळाला, त्याच्याकडे निहित केलेल्या उपक्रमांशी संबंधित अशा, कंपनीच्या मालमत्ता व मत्ता यांची, नेमलेल्या दिवशी असल्याप्रमाणे एक संपूर्ण वस्तुसूची दिली पाहिजे.

(२) शासकीय परिसमापकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असणाऱ्या, कंपनीच्या मालमत्तांशी व मत्तांशी संबंधित अशा कंपनीच्या पोट-कलम (१) खालील बोजांची त्या व्यक्तीने परतफेड केली पाहिजे आणि शासकीय परिसमापकाच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असणाऱ्या, मालमत्तांशी व मत्तांशी संबंधित अशा बोजांची शासकीय परिसमापकाने परतफेड केली पाहिजे.

राज्य शासनाने राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या मत्तांच्या मूल्याइतके शेअर्स महामंडळाने विक्रीला काढणे.

७. (१) कलम ३, पोट-कलम (२) अन्वये राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे हस्तांतरित व निहित केलेल्या, प्रत्येक कंपनीच्या उपक्रमांच्या, मत्तांच्या मूल्याइतकी रक्कम म्हणजे महामंडळाच्या सममूल्य भाग-भांडवलासाठी राज्य शासनाने दिलेले अंशदान आहे असे समजण्यात येईल; आणि अशा रीतीने दिलेल्या अंशदानाबद्दल, महामंडळ, राज्य शासनाला (जरूर तर आपला संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावली यात बदल करून) आपल्या सममूल्य भाग-भांडवलातील राज्य शासनाने संबंधित कंपनीच्या उक्त उपक्रमांच्या संपादनाबद्दल दिलेल्या रकमेएवढ्या दर्शनी मूल्यांचे, भरणा केलेले शेअर्स देईल.

संपादनाबद्दल रक्कम देणे. ८. (१) राज्य शासन, कलम ३, पोट-कलम (१) अन्वये उक्त कंपनीच्या उपक्रमांच्या हस्तांतरणाबद्दल व निहितीकरणाबद्दल, मेसर्स विजय मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (प्रायव्हेट) लिमिटेड, बडनेरा, यांच्या नावे, वीस लाख रुपये (रु. २० लाख) एवढी रक्कम न्यायालयाकडे रोख जमा करील.

(२) त्याचप्रमाणे राज्य शासन, कलम ३, पोट-कलम (१) अन्वये उक्त कंपनीच्या उपक्रमांच्या हस्तांतरणाबद्दल व निहितीकरणाबद्दल मेसर्स वेस्टर्न इंडिया स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, मुंबई, यांच्या नावे एक कोटी वीस लाख रुपये (रु. १२० लाख) एवढी रक्कम न्यायालयाकडे रोख जमा करील.

(३) शंका निवारणासाठी, याद्वारे, जाहीर करण्यात येत आहे की, दोन वस्त्रनिर्माण कंपन्यांपैकी प्रत्येक कंपनीची राज्य शासनाकडे निहित झालेल्या उपक्रमांसंबंधीची दायित्वे, यथास्थिति पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या रकमेतून, भागवण्यात येतील.

(४) राज्य शासनाकडे निहित करण्यात आलेल्या, दोन वस्त्रनिर्माण कंपन्यांपैकी प्रत्येकीच्या उपक्रमांच्या संबंधातील दायित्वे भागवताना, न्यायालय, यथास्थिति, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम—मग ती प्रतिभूत किंवा अप्रतिभूत असो—संबंधित कंपन्यांच्या धनकोंमध्ये त्यांचे हक्क व हितसंबंध यानुसार, वितरित करील आणि अशा वितरणानंतर कोणतीही जादा रक्कम उरली तर, उक्त कंपनीच्या अंशदात्यांमध्ये अशा अंशदात्यांचे हक्क व हितसंबंध यानुसार, वितरित करील.

उपक्रमांचे व्यवस्थापन व प्रशासन. ९. कलम ३, पोट-कलम (२) अन्वये जे राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाकडे निहित करण्यात आलेले आहेत अशा उपक्रमांचे व्यवस्थापन, महामंडळाच्या वतीने, या बाबतीत महामंडळाकडून नामनिर्दिष्ट करण्यात येईल अशा व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या संस्थेकडून (एक किंवा अनेक शासकीय कंपन्यांचा समावेश करून—मग त्या अधिनियम अंमलात येण्याच्या वेळी अस्तित्वात असोत किंवा त्यानंतर) कायद्याने स्थापन केलेल्या असोत—करण्यात येईल आणि अशी व्यक्ती अथवा व्यक्तींची संस्था, या बाबतीत, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने महामंडळाकडून करण्यात येतील, अशा विनियमांनुसार, व्यवस्थापनाचे काम पाहील.

कंपन्यांच्या विवक्षित कर्मचाऱ्यांची नोकरी महामंडळाकडे चालू राहणे. १०. (१) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, दोन्हीपैकी एका वस्त्रनिर्माण कंपनीच्या कोणत्याही उपक्रमांत नोकरीला असणारी प्रत्येक व्यक्ती, नेमलेल्या दिवशी व त्यानंतर, उपक्रमाच्या संबंधातील हक्क महामंडळाकडे हस्तांतरित आणि निहित करण्यात आले नसते तर तिला निवृत्तिवेतन, उपदान व इतर बाबतीत जे हक्क व विशेषाधिकार असते तेच हक्क व विशेषाधिकार यांसह, राज्य वस्त्र निर्माण महामंडळाची कर्मचारी होईल आणि महामंडळातील तिची नोकरी रीतसर समाप्त करण्यात येणार नाही तोपर्यंत किंवा तिचे पारिश्रमिक व इतर सेवा शर्ती महामंडळाकडून रीतसर बदलण्यात येणार नाहीत तोपर्यंत ती त्या नोकरीत पूर्वीप्रमाणेच राहील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये सेवेतील, कंपनीचा कोणताही कर्मचारी महामंडळाच्या सेवेत राहिल्याच्या परिणामी उपार्जित होणारे किंवा उद्भवणारे कोणतेही दायित्व हे, उद्योग (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ याच्या कलम १८- चक अन्वये केवळ उपक्रमाचे व्यवस्थापन ताब्यात घेण्याच्या तारखेला व त्या तारखेनंतरच्या कोणत्याही मुदतीच्या संबंधात असेल तरच ते महामंडळाकडून सोसण्यात येईल. ५१ चा ६५.

शास्ती. ११. (१) जी कोणतीही व्यक्ती,—

(अ) तिच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असलेली, कोणत्याही वस्त्रनिर्माण कंपनीच्या उपक्रमाचा भाग असलेली कोणतीही मालमत्ता, राज्य वस्त्रनिर्माण महामंडळापासून गैररीतीने रोखून ठेवील; किंवा

(ब) या अधिनियमान्वये महामंडळाकडे निहित करण्यात आली असेल अशा, एखाद्या वस्त्रनिर्माण कंपनीच्या उपक्रमाचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा, गैररीतीने ताबा घेईल; किंवा

(क) तिच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल असा कोणताही दस्तऐवज कलम ५, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे महामंडळाला सादर करण्याचे जाणूनबुजून रोखून ठेवील किंवा तो सादर करण्यात कसूर करील; किंवा

(ड) कलम ६ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, वस्तुसूची प्रस्तुत करण्यात, जाणूनबुजून कसूर करील; किंवा

(ई) अशी वस्तुसूची सादर करण्यास फर्मावण्यात येईल तेव्हा त्यात कोणताही खोटा असलेला आणि जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा तसे तिला वाटत असेल किंवा जो खरा नाही अशी तिची समजूत असेल असा तपशील पुरवील —

त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर दोन वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कैदेची किंवा दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, या पोट-कलमाच्या खंड (अ) किंवा खंड (ब) किंवा खंड (क) अन्वये कोणत्याही अपराधाची न्याय चौकशी करणारे कोणतेही न्यायालय, आरोप असलेल्या व्यक्तीस सिद्धापराध ठरवण्याच्या वेळी, त्या व्यक्तीने, गैररीतीने रोखून ठेवलेली किंवा गैररीतीने प्राप्त केलेली कोणतीही मालमत्ता किंवा जाणूनबुजून रोखून ठेवलेला वा सादर न केलेला कोणताही दस्तऐवज, न्यायालय ठरवून देईल त्या मुदतीच्या आत, स्वाधीन करण्याबद्दल किंवा परत करण्याबद्दल त्या व्यक्तींस आदेश देऊ शकेल.

(२) राज्य शासनाच्या किंवा त्या शासनाने यासंदर्भात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने असेल त्याव्यतिरिक्त, कोणतेही न्यायालय या कलमान्वये शिक्षा पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**१२.** (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केलेला असेल त्या बाबतीत अपराध घडला त्यावेळी कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनीची प्रभारी आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी, अपराधादाखल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याबद्दल खटला भरला जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर कोणत्याही अशा व्यक्तीने, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, ती, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही शिक्षा केली जाण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि तो कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे करण्यात आला किंवा त्याने हयगय केल्यामुळे झाला असे सिद्ध करण्यात येईल तेव्हा, कंपनीचा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव, किंवा इतर अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्या विरुद्ध खटला भरला जाण्यास व तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) "कंपनी" म्हणजे, कोणताही निगम, निकाय, आणि त्यात भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांचा समावेश होतो; आणि

(ब) "संचालक" म्हणजे, भागीदारी संस्थेच्या संबंधात, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार.

सद्भावपूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण.

**१३.** या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य वस्त्रनिर्माण महामंडळाविरुद्ध किंवा कोणत्याही वस्त्रनिर्माण कंपनीच्या उपक्रमाबाबतच्या व्यवहारांसंबंधीचे काम करणाऱ्या राज्य शासनाच्या वा महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध वा इतर कर्मचाऱ्याविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१४.** या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास प्रसंगानुरूप, आदेश काढून ती दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षाची मुदत संपल्यानंतर असा आदेश काढता येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

**१५.** (१) महाराष्ट्र वस्त्रनिर्माण कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८२ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८२ चा महा. अध्या. १२.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही (केलेला कोणताही विनियम किंवा काढलेला कोणताही आदेश यासह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये यथास्थिति केली असल्याचे, केला असल्याचे किंवा काढला असल्याचे मानण्यात येईल.

शा. मु. वाई–४ पानी २,५०० पु.–२-२०१६–एच-७६*

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई–४०० ००४.
  फोन : ०२२/२३६ ३२६ ९३, २३६ ३०६ ९५,
  २३६ ३११ ४८, २३६ ३४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे–४११ ००१.
  फोन : ०२०/२६१ २५८ ०८, २६१ २८९ २०

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर–४४० ००१.
  फोन : ०७१२/२५६ २६ १५, २५६ २८ १५

- **सहाय्यक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन,
  औरंगाबाद–४३१ ००१.
  फोन : ०२४०/२३३ १४ ६८, २३३ ११ ०९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर–४१६ ००३.
  फोन : ०२३१/२६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**